मुंबई तरुण भारत
Main Edition | 2023-07-29 | Page- 1
epaper.mahamtb.con



# तब्बल ६ वर्षांनंतर भारतीय डाळिंब अमेरिकेला रवाना

## वाशी येथील पणन मंडळाच्या सुविधा केंद्रावरून प्रायोगिक तत्त्वावर निर्यात

**विकास पांढरे मुंबई, दि. २८ :**

२०१७-१८ याकाळात भारतीय डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाला होता. त्यामुळे अमेरिकेने भारतीय डाळिंबाच्या आयातीवर बंदी घातली होती. तब्बल सहा वर्षांनंतर बंदी उठल्यानंतर प्रथमच मुंबई येथून भारतीय डाळिंबांची अमेरिकेत रवानगी करण्यात आली आहे. त्यामुळे भारतीय डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना अमेरिकन बाजारपेठ काबीज करण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

वाशी येथील कृषिपणन मंडळाच्या विकीरण



सुविधा केंद्रात डाळिंबाची प्रतवारी करण्यात आली. त्यानंतर अमेरिकन अधिकारी व नॅशनल प्लॉन्ट प्रोडक्शन ऑर्गनायझेशन (एनपीपीओ) च्या अधिकाऱ्यांनी निर्यातक्षम डाळिंबाची तपासणी केली. निर्यात मान्यतेनंतर **(पान ६ वर)**

## तब्बल ६ वर्षांनंतर भारतीय डाळिंब अमेरिकेला रवाना

प्रायोगिक तत्त्वावर तीन किलोच्या १५० बॉक्सेसमधून ४५० किलो डाळिंब गुरुवार, दि. २७ जुलै रोजी अमेरिकेला विमानाने पाठविण्यात आली आहे. त्यासाठी 'अपेडा'च्या सरव्यवस्थापिका विनीता सुधांशू यांनी डाळिंब कंटनेरला हिरवा झेंडा दाखविला. ही निर्यात कृषी पणन मंडळ, सोलापूर डाळिंब संशोधन केंद्र आणि आय. एन.आय फार्मच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे. यावेळी अमेरिकेच्या डॅग्री वॅझेक्युझ, अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव, संचालक तरूण बजाज, संजय कदम, डाळिंब संशोधन केंद्राचे डॉ. मराठे, जे. पी. सिंग, डॉ. ब्रिजिश मिश्रा, कृषी मंडळाचे उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी, विकीकरण सुविधा केंद्राचे प्रमुख सतीश वाघमोडे, निर्यातदार पंकज खंडेलवाल, डॉ. निलेश गायकवाड आदी अधिकारी व निर्यातदार उपस्थित होते.

## अमेरिकन बाजारपेठेवर लक्ष केंद्रित करणार

“ *डाळिंब हे आरोग्यासाठी हितकारक आहे. विशेषतः भारतीय डाळिंबाला जगभर मागणी आहे. फळमाशीचा प्रादुर्भावामुळे अमेरिकेने भारतीय डाळिंबावर बंदी घातली होती. आता ती उठवली आहे. त्यामुळे प्रथम प्रायोगिक तत्त्वावर ही निर्यात केली आहे. अमेरिकेन बाजारपेठेत भारतीय डाळिंबांची मागणी वाढावी यासाठी 'अपेडा', कृषिपणन मंडळ व निर्यातदार यांच्या सहकार्याने प्रयत्न करणार आहोत.*

**–विनिता सुधांशू,**
सरव्यवस्थापिका, कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरण

---

**Tarun Bharat Dt. 29/07/2023**

पुढारी

# अखेर सहा वर्षांनंतर अमेरिकेस डाळिंब निर्यात सुरू

पुढारी ANCHOR

## किडीच्या प्रादुर्भावाने भारतीय डाळिंब आयातीवर असलेली बंदी उठविली

**पुणे : अमेरिकेने भारतीय डाळिंबाच्या आयातीवरील बंदी अखेर उठविली आहे. त्यामुळे गुरुवारी (दि.२७) राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रातून एकूण १५० बॉक्समधून ४५० किलो डाळिंबाची हवाई वाहतुकीद्वारे अमेरिकेस निर्यात करण्यात आली असून, भविष्यात डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे.**

भारतीय डाळिंबामध्ये किडीचा प्रादुर्भाव आढळल्याने अमेरिकेने २०१७-१८ पासून भारतीय डाळिंब आयातीवर बंदी घातली होती. ती उठविण्यासाठी केंद्र सरकारची अपेडा संस्था, भारतीय राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून ही बंदी काही अटी व शर्तीच्या अधिन राहून उठविण्यास यश मिळविले असून, सहा वर्षांनंतरही अमेरिकेस पूर्ववत निर्यात सुरू झाली आहे. अमेरिकेने डाळिंबाच्या अटी व शर्तीमध्ये माईट वॉश, सोडियम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग-ड्राईंग आदी प्रक्रिया करून त्यांनी निश्चित केलेल्या मानांकानुसारच्या बॉक्समध्ये पॅकिंग करून डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्याचा प्रामुख्याने अंतर्भाव आहे. त्यानुसार केंद्राची अपेडा संस्था, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, सोलापूर डाळिंब संशोधन केंद्र आणि आय.एन.आय. फार्म प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने निर्यात झाली आहे. या वेळी अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव, संचालक तरुण बजाज, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक यू. के. वत्स यांच्यासह जे. पी. सिंग, डॉ. मराठे यांच्या उपस्थितीत अपेडाच्या सरव्यवस्थापक विनिता सुधांशू यांनी डाळिंबाच्या निर्यातीच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला व प्रायोगिक तत्त्वावर ४५० किलो डाळिंब विमानाने अमेरिकेतील न्यूयॉर्कला पाठविण्यात आली. या वेळी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी, विकिरण सुविधा केंद्र प्रमुख सतीश वाघमोडे, निर्यातदार पंकज खंडेलवाल, सोलापूर डाळिंब संशोधन केंद्राचे डॉ. नीलेश गायकवाड व अन्य अधिकारी उपस्थित होते.



**अपेडाच्या सरव्यवस्थापक विनिता सुधांशू यांनी डाळिंबाच्या निर्यातीच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवून कंटेनर रवाना केला. या वेळी उपस्थित मान्यवर.**

> भारतीय डाळिंबात कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे अ‍ॅन्टीऑक्सिडंट आहेत. तिथल्या त्वचेच्या विकारांवरील उपचारासाठी असणाऱ्या मार्गदर्शक डाएटमध्ये डाळिंबाचा समावेश आहे. त्यामुळे अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाच्या जातीला जास्त मागणी आहे. या निर्यातीमुळे अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होत असल्याने डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना भविष्यात फायदा होणार आहे.
>
> - **संजय कदम,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

**अमेरिकन निरीक्षकाच्या उपस्थितीत तपासणी**

पणन मंडळाच्या वाशी येथील भाजीपाला प्रक्रिया केंद्रावर डाळिंबाची प्रतवारी करून त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर डाळिंब तीन किलोच्या बॉक्समध्ये भरून त्यावर सुविधा केंद्रात अमेरिकेच्या निरीक्षक आणि एन.पी.पी.ओ.च्या अधिकाऱ्यांच्या तपासणीअंती संयुक्त मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण १५० बॉक्सेसमधून ४५० किलो डाळिंब हवाईमार्गे पाठविण्यात आल्याचे पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी यांनी सांगितले.

THE FREE PRESS JOURNAL

पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्राचा लाभ

# अमेरिकेस प्रायोगिक तत्त्वावर डाळिंब निर्यात सुरू

**मुंबई** : डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सन २०१७-२०१८ मध्ये अमेरिकेने भारतातून डाळिंब आयात करण्यास बंदी घातली होती. अपेडा, भारत सरकार, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर आणि आय.एन.आय. फार्म प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमा अमेरिकेस डाळिंब निर्यातीचे नियोजन करून गुरुवारी (२७ जुलै) कृषि पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरुन प्रायोगिक तत्त्वावर डाळींब निर्यात पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

गेली ५-६ वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही. सदर बंदी उठवणेबाबत अपेडा व एन.पी.पी.ओ. भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून ही निर्यात बंदी उठवावी यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार सन २०२२ पासून अमेरिकेने घातलेली निर्यात बंदी उठवली. मात्र त्यासाठी त्यांनी काही नियम व अटी घालण्यात आल्या. त्यामध्ये माईट वॉश, सोडियम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग ड्राइंग इ. प्रक्रिया करून त्यांनी निश्चित केलेल्या मानकानुसार बॉक्समध्ये पॅकिंग करून डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे.



महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई येथील सुविधा केंद्रावर सदर डाळिंबाची प्रतवारी करून त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर सदर डाळिंब तीन किलोच्या बॉक्समध्ये भरून त्यावर विकिरण सुविधा केंद्रात अमेरिकन इस्पेक्टर आणि एन.पी.पी.ओ.च्या अधिकाऱ्यांच्यातपासणी अंती मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण १५० बॉक्सेसमधून ४५० किलो डाळिंब हवाई मार्गे पाठविण्यात आले आहे.

याप्रसंगी अपेडाचे चेअरमन अभिषेक देव (भा.प्र.से.), तरुण बजाज, संचालक अपेडा, संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूरचे डॉ. मराठे, यु. के. वत्स, सरव्यवस्थापक, अपेडा, जे. पी. सिंग, प्लॅट प्रोटेक्शन अँडवाईजर, यांनी ऑनलाईन फ्लॅग ऑफ कार्यक्रमामध्ये ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन करून सर्वांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. तद्नंतर विकिरण सुविधा केंद्र येथे सर्वांच्या उपस्थितीत अपेडाच्या सरव्यवस्थापिका विनिता सुधांशू यांनी या डाळिंबाचे कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला व प्रायोगिक तत्त्वावर डाळिंबाचे १५० बॉक्स म्हणजे ४५० किलो डाळिंब विमानाने अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे पाठविण्यात आले. या निर्यातीनंतर अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी अमेरिकेच्या इन्सपेक्टर श्रीमती. डॅग्नी वॅझेक्युझ, प्लॅट क्वारंटाईन चे मुंबई विभागाचे प्रमुख डॉ. ब्रिजेश मिश्रा, कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी, विकीरण सुविधा केंद्र प्रमुख सतीश वाघमोडे, निर्यातदार पंकज खंडेलवाल, डाळींब संशोधन केंद्र सोलापूरचे डॉ. निलेश गायकवाड व अपेडा, एन.पी.पी.ओ. इ. अधिकारी व निर्यातदार आदी उपस्थित होते.

नवराष्ट्र

**कृषि** • डाळींबाचा एक कंटेनर परदेशात रवाना; आयात करण्यास बंदी घातली होती

# 'पणन'कडून अमेरिकेला डाळींब निर्यात

पुणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. निर्यातबंदी बंदी उठविल्यानंतर पणन मंडळाकडून प्रायोगिक तत्वावर डाळींब निर्यात सुरु केली आहे. वाशी येथील विकीरण सुविधा केंद्रांतून डाळींबाचा एक कंटेनर अमेरीकेला रवाना झाला आहे. सन २०१७-१८ मध्ये डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरीकेने भारतातून डाळिंब आयात करण्यास बंदी घातली होती. त्यामुळे गेली ५- ६ वर्षे अमेरीकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही. सदर बंदी उठविण्यासाठी अपेडा व केंद्र सरकारच्या एन.पी.पी.ओ. यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा केली. त्यास २०२२ मध्ये यश आले, अमेरीकेने घातलेली निर्यात बंदी उठवली, मात्र त्यासाठी त्यांनी काही नियम व अटी घालण्यात आल्या. त्यामध्ये माईट वॉश, सोडीयम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग-ड्राईंग इ. प्रक्रिया करुन त्यांनी निश्चित केलेल.

## निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया

मानांकानुसारच्या बॉक्समध्ये पॅकींग करुन डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे या अटी, नियमांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, डाळिंब संशोधन केंद्र, सोलापुर आणि आय.एन.आय फार्म प्रा.लि. (INI) यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरीकेस डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले व डाळिंबाचा कंटेनर २७ जुलै ला कृषि पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरुन रवाना झाला. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई येथील सुविधा केंद्रावर सदर डाळिंबाची प्रतवारी करुन त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली.



## भारतीय जातीला मागणी

- भारतीय डाळिंबात कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे अँन्टीऑक्सीडंट आहेत.
- तेथे त्वचेच्या विकारांवरील उपचारासाठी असणा-या मार्गदर्शक डाइट मध्ये डाळिंबाचा समावेश आहे.
- अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाच्या जातीला जास्त मागणी आहे.

## अमेरिकेच्या कृषि विभागाशी चर्चा

सदर डाळिंब तीन किलोच्या बॉक्समध्ये भरु[illegible] त्यावर विकिरण सुविधा केंद्रात अमेरीकन इस्पेक्ट[illegible] आणि एन.पी.पी.ओ. च्या अधिकाऱ्यांचे तपासण[illegible] अंती मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिय[illegible] करण्यात आली. एकूण १५० बॉक्सेसमधून ४५[illegible] किलो डाळिंब हवाई मार्गे पाठविण्यात आला आहे[illegible] याप्रसंगी अपेडाचे चेअरमन अभिषेक दे[illegible] (भा.प्र.से.),संचालक तरुण बजाज, पण[illegible] मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आद[illegible] उपस्थित होते. सदर बंदी उठविण्यासाठी अपेडा [illegible] केंद्र सरकारच्या एन.पी.पी.ओ. यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा केली.



# अखेर डाळिंबाची अमेरिकेला निर्यात

## बंदी उठवण्यात सरकारला यश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळ माशीचा प्रादुर्भाव असल्यामुळे २०१८ पासून अमेरिकेने भारतीय डाळिंबाच्या आयातीवर बंदी घातली होती. केंद्र सरकार, प्लॉट कॉरंटाईन इंडिया यांनी ही बंदी उठवण्यासाठी अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा केली होती. त्याला यश आले आहे. त्यानुसार डाळिंबाच्या विकेंद्रीकरणाची प्रकिया करून गुरुवारी प्रायोगिक तत्त्वावर या फळाच्या ४५० पेट्या डाळिंब विमानाने अमेरिकेतील न्यू यॉर्क येथे पाठविण्यात आले.

नवी मुंबईतील अपेडा कार्यालयाच्या महाव्यवस्थापक विनिता सुधांशू यांनी गुरुवारी या गाडीला मार्गस्थ केले. महाराष्ट्रातून आंबा, द्राक्ष, केळी यांसारख्या विविध फळांची हंगामानुसार मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. मात्र डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळ माशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे २०१८ पासून अमेरिकेने भारतीय डाळिंबाच्या आयातीवर बंदी घातली होती. यामुळे डाळिंबाच्या निर्यातीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. केंद्र सरकार, प्लांट कॉरंटाईन इंडिया यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून ही निर्यातबंदी उठवावी यासाठी प्रयत्न केले होते.

**Loksatta Dt. 29/07/2023**

लोकमत

# डाळिंब निघाले अमेरिका वारीला

## २०१८ पासून होती बंदी; १५० किलो डाळिंब रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई** : डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे २०१८ पासून अमेरिकेने भारतीय डाळिंबाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. त्यानंतर केंद्र सरकार, प्लांट क्वारंटाइन, इंडिया यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा केल्यानंतर २०२२ पासून निर्यातबंदी उठली. मात्र, त्यासाठी काही नियम आणि अटी घातल्या आहेत. त्यानुसार डाळिंबाच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया करून गुरुवारी प्रायोगिक तत्त्वावर डाळिंबाचे ४५० खोके म्हणजे १५० किलो डाळिंब विमानाने न्यूयॉर्कला पाठविण्यात आले.

नवी मुंबईतल्या तुर्भे येथील अपेडा कार्यालयाच्या जनरल मॅनेजर विनिता सुधांशू यांनी या गाडीला हिरवा झेंडा दाखविला. यावेळी अपेडाचे चेअरमन अभिषेक देव, मुंबई प्रादेशिक विभागाचे उपमहाव्यवस्थापक नागपाल लोहकरे, मुंबई विभागाचे प्रमुख ब्रजेश मिश्रा, कृषी पणन मंडळाचे मिलिंद जोशी, अपेडाचे उपसंचालक ब्रिजेश मेहता, अमेरिकेच्या निरीक्षक डॅग्नी वॅझेक्युझ, विकिरण सुविधा केंद्राचे प्रमुख सतीश वाघमोडे, निर्यातदार पंकज खंडेलवाल, सोलापूरच्या डाळिंब संशोधन केंद्राचे डॉ. नीलेश गायकवाड, डॉ. जी. पी. सिंग, एनआरसीचे संचालक डॉ. मराठे, महाराष्ट्र स्टेट ॲग्रिकल्चर मार्केटिंग बोर्डचे संचालक संजय कदम, आयएनआय फॉमचे संचालक पंकज खंडेवाल आदी उपस्थित होते.



डाळिंबाच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया करून डाळिंबाचे ४५० खोके विमानाने न्यूयॉर्कला पाठविण्यात आले.

### त्वचेसाठी असाही फायदा

या निर्यातीनंतर अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. भारतीय डाळिंबात कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे ॲन्टी ऑक्सिडंट आहेत. तिथल्या त्वचेच्या विकारांवरील उपचारासाठी असणाऱ्या मार्गदर्शक डाएटमध्ये डाळिंबाचा समावेश केला आहे.



भारतीय डाळिंबांनी अमेरिकेची बाजारपेठ काबीज केल्यानंतर राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

**- नागपाल लोहकरे,** उपमहाव्यवस्थापक, मुंबई प्रादेशिक विभाग, अपेडा

# अमेरिकेला प्रायोगिक तत्त्वावर डाळिंबाची निर्यात

**पुणे :** कृषी उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (अमेडा) राष्ट्रीय पीक संरक्षण संस्था (एनपीपीओ) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर आणि आयएनआय फार्म प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी (मुंबई) येथील विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेला प्रायोगिक तत्त्वावर डाळिंब निर्यातीचा शुभारंभ करण्यात आला. या निर्यातीनंतर अमेरिकेत मोठी बाजारपेठ खुली होईल, असा विश्वास अमेडाच्या महाव्यवस्थापक विनिता सुधांशू यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास अमेडाचे अध्यक्ष अभिषेक देव, संचालक तरुण बजाज, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूरचे डॉ. आर. ए. मराठे, अमेडाचे सरव्यवस्थापक यु. के. वत्स, प्लँट प्रोटेक्शन ॲडवायजर जे. पी. सिंग, विकिरण सुविधा केंद्राचे प्रमुख सतीश वाघमोडे आदींसह अधिकारी व निर्यातदार उपस्थित होते.

डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरिका देशाने भारतातून डाळिंबाची आयात करण्यास २०१७-१८ मध्ये बंदी घातली होती. अमेडा व एनपीपीओ भारत सरकार यांनी संयुक्तरित्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी वारंवार चर्चा केली असता मानकाच्या आधारे २०२२ मध्ये निर्यात बंदी उठविण्यात आली.

डाळिंब फळाविषयी निश्चित केलेल्या मानकानुसारच्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे भाजीपाला प्रक्रिया केंद्र वाशी (नवी मुंबई) येथील सुविधा केंद्रावरून डाळिंबाचे १५० खोके (४५० किलो) अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे हवाईमार्गे पाठविण्यात आल्याची माहिती उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी यांनी दिली आहे.

Kesari Dt. 29/07/2023

# अमेरिकेत डाळिंब निर्यात सुरू

» पान १ वरून

घातल्यानंतर निर्यातीच्या वाटा बंद झाल्याची एकंदरीत स्थिती होती; मात्र पाठपुराव्यानंतर ही निर्यात बंदी उठली. मात्र अटी, शर्ती घालू अमेरिकेच्या कृषी मंत्रालयाने घालून दिल्या. त्यांनतर गुरुवारी (ता. २७) अपेडा, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र आणि आय. एन. आय. फार्म यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकेमध्ये निर्यात झाली. हे कामकाज कृषी पणन मंडळाच्या आंतरराष्ट्रीय निर्यात सुविधा केंद्र येथील विकिरण सुविधा केंद्रावरून प्रायोगिक तत्त्वावर पार पडले.

याप्रसंगी 'अपेडा'चे अध्यक्ष अभिषेक देव, संचालक तरुण बजाज, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे, 'अपेडा'चे सरव्यवस्थापक यू. के. वत्स, पीक संरक्षण सल्लागार जे. पी. सिंग यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखविला. तर विकिरण सुविधा केंद्र येथे अपेडाच्या सरव्यवस्थापिका विनिता सुधांशू यांनी डाळिंब कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी अमेरिकेच्या निरीक्षक श्रीमती डॅग्नी वॅझेक्युझ, प्लांट क्वारंटाइन मुंबई विभागाचे प्रमुख डॉ. ब्रिजेश मिश्रा, डाळिंब संशोधन केंद्राचे डॉ. नीलेश गायकवाड, अपेडाचे उपसरव्यवस्थापक नागपाल लोहकरे, 'पणन'चे उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी, विकिरण सुविधा केंद्र प्रमुख सतीश वाघमोडे, निर्यातदार पंकज खंडेलवाल आदी उपस्थित होते.

**...निकष पाळून कामकाज**

कृषी पणन मंडळाच्या वाशी (नवी मुंबई) येथील आंतरराष्ट्रीय शेतीमाल सुविधा केंद्रावर प्रतवारी करून त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये माईट वॉश, सोडिअम हायपोक्लोराइड प्रक्रिया, वॉशिंग ड्राइंग आदी प्रक्रिया होती. त्यांनी निश्चित केलेल्या मानकानुसार ३ किलोच्या खोक्यात पॅकिंग करून डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे. १८ जुलै रोजी विकिरण सुविधा केंद्रात अमेरिकन निरीक्षक आले होते. त्यांनी एनपीपीओ अधिकारी यांच्या समक्ष तपासणी करून मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. त्यानुसार एकूण १५० बॉक्सेसमधून ४५० किलो डाळिंब विमानातून पाठविण्यात आला आहे.

**यापूर्वी आंबा निर्यात प्रक्रियेत निकष पूर्ण झाले होते. तर आता डाळिंब या फळात निर्यातीचा हा पहिला टप्पा पार झाला. यासह निर्यातदारांना आवश्यक ती मदत केली जाणार आहे. अमेरिकन बाजारपेठेत भारतीय डाळिंबाचा बाजार हिस्सा वाढविण्यासाठी अपेडा, राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था, राज्य कृषी पणन मंडळ, अमेरिका सरकारच्या कृषी मंत्रालयाच्या प्राणी व वनस्पती आरोग्य तपासणी सेवा विभाग व निर्यातदार यांच्या सहकार्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.**

**- नागपाल लोहकरे,** उपमहाव्यवस्थापक-अपेडा, मुंबई

अॅग्रोवन

# अमेरिकेत डाळिंब निर्यात सुरू

## फळांवर विकिरण प्रक्रिया; पाच वर्षांनंतर ४.५ क्विंटल माल गेला हवाईमार्गाने

**मुकुंद पिंगळे** : ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : २०१८ मध्ये डाळिंब व डाळिंब दाणे निर्यात सुरू होती. दरम्यान, डाळिंब दाण्यांमध्ये फळमाशी आढळून आल्याने अमेरिकेच्या कृषी मंत्रालयाने ही बाब गांभीर्याने घेत भारतीय डाळिंब आयातीवर निर्बंध आणले. परिणामी, गेली पाच वर्षे ही निर्यात पूर्णतः बंद होती. ती पुन्हा सुरू करण्यासाठी भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या 'अपेडा' व कृषी मंत्रालयाच्या राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून निर्यातबंदी उठविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. अखेर २०२२ मध्ये बंदी उठली. त्यानंतर काही निकष व पद्धती निश्चित झाल्या. त्यांची पूर्तता झाल्यानंतर पाच वर्षांनंतर प्रायोगिक तत्त्वावर पुन्हा डाळिंब निर्यात सुरू झाली आहे. यामध्ये फळांवर विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे.

पाच वर्षांपूर्वी अमेरिकेच्या कृषी विभागाने डाळिंब आयातीवर बंदी

पान ४ वर »



**वाशी, नवी मुंबई : येथील सुविधा केंद्रात डाळिंब निर्यात होण्यापूर्वी कामकाजाची पाहणी करताना 'अपेडा', एनपीपीओ आणि अमेरिकेच्या कृषी मंत्रालयाचे निरीक्षक.**

> **प्रायोगिक तत्त्वावर डाळिंब विमानाने अमेरिकेतील न्यू यॉर्क येथे पाठविण्यात आले. या निर्यातीनंतर अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होईल.**
>
> – **विनिता सुधांशू**, सरव्यवस्थापिका, अपेडा

पुढारी

# 'स्मार्ट'अंतर्गत १२२१ कोटींच्या ६०१ प्रकल्पांना मंजुरी

## उत्पादक कंपन्यांना ७३० कोटींचे अनुदान मंजूर; नव्याने ४.५० लाख मे. टन साठवणूक क्षमता वाढणा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारच्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत सुमारे १२२१ कोटी रुपयांच्या ६०१ प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये स्मार्टअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्के म्हणजे ७३० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झालेले आहे. राज्यात प्रकल्पांतर्गत गोदामांची नव्याने ४ लाख ५० हजार ३६३ मेट्रिक टनाइतकी साठवणूक क्षमता नव्याने निर्माण होणार आहे.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत मूल्य साखळी विकास उपप्रकल्पांचा लाभ प्रामुख्याने शेतकरी उत्पादक कंपनी, लोकसंचालित साधन केंद्र, प्रभाग संघ आणि प्राथमिक सहकारी संस्था तथा विकास सोसायटी या समुदाय आधारित संस्थांना देण्यात येतो. मात्र, प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ किंवा अनुदान दिले जात नाही. स्मार्ट प्रकल्पांतर्गत ६०१ शेतकऱ्यांच्या समुदाय आधारित संस्थांची उपप्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत. या उपप्रकल्पांद्वारे सुमारे ४ लाख ३९ हजार शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. एकूण मान्यता दिलेल्या प्रकल्पांची संख्या १ हजार २१५ इतकी आहे आणि ६०१ उत्पादक कंपन्यांना बाराशे एकवीस कोटींचे प्रकल्प मंजूर केलेले आहेत. त्यामध्ये ७३० कोटी ४६ लाख रुपयांचे अनुदान मंजूर झालेले आहे, तर प्रत्यक्षात १३२ कोटी ८० लाखांचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे, तर शेतकरी उत्पादक कंपन्यांनी प्रकल्प उभारणीत स्वभांडवलातून प्रकल्पाच्या ४० टक्क्यांइतका म्हणजे ४९१ कोटी रुपयांइतका खर्च करावयाचा आहे.

> प्राथमिक मंजुरी प्रकल्पधारकांनी अंतिम मंजुरीसाठी त्यांचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. राज्यातील गोदामे साठवणूक क्षमता वाढीचा फायदा शेतकऱ्यांना होईल आणि शेतमालास वाजवी भाव मिळण्यास मदत होण्याचीही अपेक्षा आहे.
>
> - **कौस्तुभ दिवेगावकर,** प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे.

**मंजूर उपप्रकल्प**

स्मार्टअंतर्गत मंजूर उपप्रकल्पाची शेतकरी उत्पादक कंपन्यांची पीकनिहाय संख्या पाहता तृणधान्य १५४, कडधान्य ९३, तृणधान्य व कडधान्य ५७, तेलवर्गीय पिके ८०, कापूस ५, फळे भाजीपाला १४७, मसाला पिके २० शेळी व परसबागेतील कुक्कुटपालन ३ आणि इतर १० मिळून एकू ६०१ प्रकल मंजूर करण्यात आलेले आहेत. मंजू घटकांची वर्गवारी पाहता गोदामे ३०७ प्राथमिक प्रक्रिया ३०४, डाळ मिल ७५ फ्लोअर मिल ३१, ऑइल मिल ३० भात गिरणी ४३, कांदा चाळ ५२ अवजारे बँक २६०, पशुखाद्य निर्मित २२, पशू विलगीकरणासाठी जाग अथवा शेड १०, शीतसाखळी घट ५६ उपप्रकल्पाचा समावेश आहे प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्य गोदामांची क्षमता पाहता राज्या नव्याने ४ लाख ५० हजार ३६३ मेट्रि टन इतकी साठवणूक क्षमता नव्या निर्माण होणार असल्याची माहित अधिकाऱ्यांनी दिली.

Pune Gramin Edition
Jul 24, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# राज्यातील खासगी बाजार समित्यांचेही होणार रँकींग

## पणन संचलनालयाच्या 'स्मार्ट' प्रकल्पातून अंमलबजावणी

**विनोद इंगोले : अॅग्रोवन वृत्तसेवा**



अमरावती : शेतकरी केंद्रित उपक्रम राबविणाऱ्या बाजार समित्यांना मा. बाळासाहेब ठाकरे ग्रामीण व्यवसाय व कृषी परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत रँकींग देत त्यांना गौरविण्याची संकल्पना गेल्या वर्षीपासून राबविली जात आहे. आता या संकल्पनेअंतर्गत परवाना मिळून दोन वर्ष झालेल्या खासगी बाजार समित्यांचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. सद्या राज्यात अशाप्रकारच्या ६६ बाजार समित्या असल्याची माहिती स्मार्टचे तंत्र अधिकारी राजेंद्र पालेकर यांनी दिली.

बाजार समिती रँकींग संदर्भात जागृती करण्याच्या अनुषंगाने विदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यानिमित्ताने दौऱ्यावर असलेल्या श्री. पालेकर यांनी 'अॅग्रोवन' सोबत संवाद साधला ते म्हणाले, राज्यात एकूण ३०६ बाजार समित्या आहेत. त्याच्या सोबतीला ८८ बाजार समित्या खासगी आहेत. बाजार समिती कायद्यान्वये अस्तित्वात असलेल्या बाजार समित्यांसाठी वेगळे तर खासगी बाजार समित्यांकरीता स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आली आहे. 'यशदा'मध्ये ७७ खासगी बाजार समित्यांच्या व्यवस्थापनाची कार्यशाळा पण घेण्यात आली. त्यांच्याकडून सूचना मागविण्यात आल्या. त्यावर पणन संचालनालयात चर्चा झाली. त्याअंती निकष अंतिम करण्यात आले आहेत. रँकींगसाठी यंदा पहिल्यांदाच खासगी बाजारांचाही विचार करण्यात आला आहे. खासगी बाजार समितीला परवाना मिळून किमान दोन वर्षांचा कालावधी झालेला असावा. त्यानुसार सध्या राज्यात असलेल्या ८८ पैकी ६६ खासगी बाजार समित्यांचा परवाना कालावधी दोन वर्षांचा आहे. त्यांना यासाठी पात्र ठरविले जाणार आहे. राज्य तसेच आठ विभागस्तरावरही बाजार समित्यांना रँकींग दिले जाणार आहे.

**रँकींग मिळालेल्या बाजार समित्यांना पणन संचालकांकडून प्रमाणपत्र देण्यात येत होते. यंदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बाजार समित्यांना गौरविण्याचे प्रस्तावित आहे. नियमावलीतही सुधारणा करण्यात आली असून यंदा पहिल्यांदाच खासगी बाजार समित्यांनाही स्वतंत्रपणे रँकींग दिले जाणार आहे. पणन संचालक शैलेश कोतमीरे यांच्या मार्गदर्शनात ही संकल्पना राबवली जात आहे.**

– **राजेंद्र पालेकर,** प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पणन संचालनालय, स्मार्ट तंत्र अधिकारी,

### बाजार समित्यांच्या रँकींगचे निकष

- कलम ५७ अंतर्गत कार्यवाहीचा अवॉर्ड झालेला नसावा.
- कलम ४३ अंतर्गत संचालक मंडळावर बरखास्तीची कारवाई नको.
- कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधी व इतर देणी संबंधित खात्यात नियमित जमा करणे.
- लिलाव परिसरात रस्ते, ड्रेनेज, लिलावगृह/ओटे दर्जेदार असावे.
- भुईकाटा, इलेक्ट्रॉनिक काट्याची सोय.
- भाडेतत्वावरील गाळे, भूखंडाची नियमित भाडे वसुली.

Agrowon Dt. 20/07/2023

# हापूससह प्रक्रिया उत्पादनांची पोस्टाद्वारे निर्यात

## रत्नागिरीत डाक निर्यात केंद्र सुरू; गतवर्षी १० लाखांचा महसूल

रत्नागिरी : हापूससह प्रक्रिया उत्पादने रत्नागिरीतून थेट परदेशात निर्यात करण्यासाठीची सुविधा पोस्ट विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. गतवर्षी जिल्ह्यातून ५८८ ग्राहकांनी परदेशात वस्तू पाठवल्या होत्या. त्याद्वारे १० लाखांचा महसूल मिळाला. लोकांचा वाढता प्रतिसाद पाहून रत्नागिरीतील मुख्य कार्यालयात डाक निर्यात केंद्र सुरू करण्यात आले आहे. याद्वारे वस्तूंचे व्यवस्थित पॅकिंग करून खासगीपेक्षा पन्नास टक्के कमी दराने वस्तू परदेशात पाठविण्यात येणार आहेत.

### कनेक्टिव्हिटीसाठी साडे सोळा लाखांचा खर्च

पोस्ट खाते कात टाकत असून ग्राहकांच्या मागणीनुसार बदल केले जात आहेत. नेट कनेक्टिव्हिटीमधील अडथळे दूर करण्यासाठी जिल्ह्यातील ३० डाक घर ऑप्टिकल फायबरने जोडण्यात आली आहेत. त्यासाठी १६ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे गेले वर्षभर कनेक्टिव्हिटी वेगवान झाली आहे. तसेच पोस्टात टाकलेले टपाल रत्नागिरीतून मंडणगडला पोहोचण्यास दोन दिवस लागत होते. पोस्टाचे स्वतःचे टपाल वाहन असल्यामुळे दुपारपर्यंत टपाल मंडणगडला पोहोचते. आता एसटीवर अवलंबून रहावे लागत नाही. लवकरच राजापूर, देवरुखलाही टपाल वाहन सुरू केले जाणार असल्याचे कुरलपकर यांनी सांगितले.

शहरातील लक्ष्मीचौक येथील मुख्य कार्यालयात डाक घर निर्यात केंद्राचे उद्‍घाटन आंबा व्यावसायिक आनंद देसाई यांच्या हस्ते झाले. या वेळी डाक अधीक्षक एन. टी. कुरलपकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी श्री. देसाई यांनीही समाधान व्यक्त करतानाच आंबा पल्प परदेशात पाठविण्यासाठी याचा सर्वाधिक फायदा आम्हाला होईल, असे सांगितले. आतापर्यंत देसाई यांच्यासह अन्य बागायतदार किंवा स्थानिक नागरिक आपल्या नातेवाईकांना परदेशात वस्तू पाठविण्यासाठी खासगी सेवांचा वापर करत होते. त्याचा खर्च अधिक होत होता. मात्र पोस्ट खात्याकडून परदेशात वस्तू पाठविण्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण केली आहे.

डाक निर्यात केंद्राविषयी डाक अधीक्षक कुरलपकर म्हणाले, की परदेशात मोठ्या प्रमाणात वस्तू पाठवल्यात जात आहेत. यामध्ये रत्नागिरीतील देसाई यांच्याकडून पल्पची निर्यात होते. अशा प्रकारच्या मठ्या ग्राहकांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना पोस्टाची ही सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामध्ये वस्तूच्या वजनाप्रमाणे पॅकिंगसाठी बॉक्स दिले जाणार आहेत. ग्राहकांची जीएसटी नोंदणी झाली की त्या वस्तू परदेशातील पोस्टापर्यंत व्यवस्थितरीत्या पोहोच केल्या जातील. रत्नागिरी जिल्ह्यातून गतवर्षी ५८८ लोकांनी परदेशात पार्सल पाठवली. अमेरिका, कॅनडा, रशिया, इंग्लड, फ्रान्स या देशांत सर्वाधिक वस्तू गेल्या आहेत. खासगी सेवांपेक्षा पोस्टाचे निर्यातीचे दर ५० ते ६० टक्के कमी राहतील.

Agrowon Dt. 18/07/2023

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-07-15 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# काटोलमध्ये होणार संत्रा प्रक्रिया केंद्र

◆ **काटोल, १४ जुलै**

काटोल नरखेड विधानसभा मतदार संघातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती काटोलमार्फत संत्रा प्रक्रिया केंद्र उभारले जाणार आहे. अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तसेच कृषी पणन मंडळाचे संचालक चरणसिंग ठाकूर यांनी दिली.

कृषी पणन मंडळ व संत्रा उत्पादक शेतकरी यांची संयुक्त बैठक शुक्रवार १४ जुलै रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती काटोल येथे पार पडली.

यावेळी चरणसिंग ठाकूर यांनी संत्रा प्रक्रिया केंद्राची माहिती दिली.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे येथील कार्यकारी संचालक संजय कदम, उपमहाव्यवस्थापक राजेश सरोदे, संचालक विनोद धुर्वे, संचालक मोहन मुन्ने, यादव तातोडे, कृषी उत्पन्न बाजार समिती काटोलचे सचिव पराग दाते उपस्थित होते.



काटोल येथे पार पडलेल्या बैठकीत मान्यवरांचा सत्कार करताना चरणसिंग ठाकूर, बाजूला पराग दाते

नागपूरची संत्री जगात प्रसिद्ध आहे. काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघात संत्र्याचे भरपूर उत्पादन होते. मात्र त्यावर प्रक्रिया करता येत नसल्याने शेतकऱ्यांना तो जागतिक दर्जाचा संत्रा कवडीमोल भावाने विकावा लागतो. याच कारणाने आज शेतकरी फार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्याच शेतकऱ्यांना अडचणींच्या चक्रव्यूहातून बाहेर काढण्यासाठी संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे काळाची गरज असल्याची भूमिका चरणसिंग ठाकूर यांनी मांडली. त्यानुसार शासनाने तरतूद केली आहे.

संत्रा पॅकिंग, ग्रीटिंग, वॅक्सिंग, संत्रा ठेवण्यासाठी युनिटच्या बांधकामासाठी निधीची तरतूद, काटोल येथील संत्रा प्रक्रिया युनिट कृषी उत्पन्न बाजार समिती काटोलच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. कृषी पणन महामंडळ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना निर्यातीसाठी प्रशिक्षित करणार आहे. यातून शेतकऱ्यांना संत्र्याचे मार्केटिंग आणि निर्यातीची माहिती मिळेल.

जेणेकरून शेतकऱ्यांच्या संत्र्याला चांगला भाव मिळेल, अशी माहिती कृषी पणन महामंडळाचे संचालक व अध्यक्ष चरणसिंग ठाकूर यांनी दिली आहे. कार्यकारी संचालक संजय कदम यांनी संत्रा प्रक्रिया युनिटबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. उप सर प्रशासक अजय कडू यांनी प्रास्ताविक केले. सचिव पराग दाते यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

# संतरा प्रक्रिया यूनिट का होगा निर्माण : ठाकुर



संवाददाता | काटोल

काटोल-नरखेड़ विधानसभा क्षेत्र के लिए संतरा उत्पादक किसान को राहत दिलाने के लिए, कृषि उपज बाजार समिति, काटोल द्वारा काटोल में संतरा प्रक्रिया यूनिट का निर्माण जल्द ही होने की जानकारी कृषि उपज बाजार समिति सभापति व महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडल के संचालक चरणसिंग ठाकुर ने दी। काटोल कृषि उपज बाजार समिति सभागृह में कृषि पणन मंडल पुणे और संतरा उत्पादक किसान की संयुक्त सभा का आयोजन शुक्रवार को किया गया था। सभा में बतौर अध्यक्ष ठाकुर संबोधित कर रहे थे। महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडल, पुणे के कार्यकारी संचालक संजय कदम, उप व्यवस्थापक राजेश सरोदे, संचालक विनोद धुर्वे, संचालक मोहन मुत्रे, यादव तातोड़े, सचिव पराग दाते आदि उपस्थित थे। आगे ठाकुर ने कहा कि, विश्व में नागपुर का संतरा प्रसिद्ध है। काटोल- नरखेड़ विधानसभा क्षेत्र में संतरे का उत्पादन बहुत होता है, किंतु बे-मोल भाव मिलने से संतरा उत्पादक किसान संकट में हैं। संतरा उत्पादक किसानों को संतरे का अच्छा मूल्य मिलने के लिए, पैकिंग ग्रीटिंग, वैक्सिंग, संतरे को रखने के लिए यूनिट निर्माण के लिए सरकार द्वारा निधि का प्रावधान किया गया। काटोल में संतरा प्रक्रिया यूनिट कृषि उपज बाजार समिति, काटोल संतरा उत्पादकों के लिए वरदान साबित होगा।

कृषि पणन महामंडल द्वारा संतरा उत्पादक किसानों को निर्यात करने के लिए प्रशिक्षित किया जाएगा। किसानों को संतरे की मार्केटिंग निर्यात करने की जानकारी मिलेगी और किसान को संतरे का अच्छा मूल्य भी मिलने की जानकारी ठाकुर ने दी। कार्यकारी संचालक संजय कदम ने संतरा प्रक्रिया यूनिट के बारे में किसानों को मार्गदर्शन किया। प्रस्तावना उप व्यवस्थापक अजय कडू ने रखी। आभार सचिव पराग दाते ने माना। इस दौरान कृषि उपज बाजार समिति के संचालक, संतरा उत्पादक किसान बड़ी संख्या में उपस्थित थे।

Dainik Bhaskar Dt. 15/07/2023

# शेतकऱ्यांसाठी विविध जिल्ह्यांत 'एनआयपीएचटी'च्या शाखा सुरू करा

## राजेशकुमार : नावीन्यपूर्ण प्रशिक्षण सुरू करण्याच्या सूचना

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेने (एनआयपीएचटी) संस्था स्वबळावर उभी करण्यासाठी उत्पन्नाची नवीन साधने शोधावीत, तसेच राज्याच्या विविध भागातील शेतकऱ्यांना त्यांच्याच भागात प्रशिक्षण देण्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये शाखा सुरू करून, नावीन्यपूर्ण प्रशिक्षण सुरू करावे, अशी सूचना सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या.

राजेशकुमार यांनी तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेला भेट देऊन आढावा घेतला. यावेळी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, सुगीपश्चात संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

राजेशकुमार म्हणाले, ''राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी ऑनलाइन प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत. दूरच्या प्रशिक्षणार्थींना लाभ मिळण्यासाठी संस्थेने समाज माध्यमाचा वापर वाढवावा. 'मॅग्नेट' प्रकल्पातून संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामकाजासाठी काही घटक घेता येतील का, याचाही विचार करावा. राज्यात काही ठिकाणी संस्थेच्या शाखा सुरु करता येतील का याचीही चाचपणी करण्यात यावी,'' अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. संस्थेत १३ विषयांवरील प्रशिक्षण देण्यात येत असून आजपर्यंत संस्थेने ६१ हजार ३०० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्याचे श्री. कोकरे यांनी सांगितले.



**तळेगाव दाभाडे : एनआयपीएचटी संस्थेला अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी भेट देऊन पाहणी केली.**

Agrowon Dt. 11/07/2023

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने उत्पन्नाची नवी साधने शोधावीत : राजेश कुमार

**पुणे** : राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने संस्था स्वबळावर उभी करण्यासाठी उत्पन्नाची नवीन साधने शोधावीत आणि नावीन्यपूर्ण प्रशिक्षण सुरू करावे, असे आवाहन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी केले. मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडेमधील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला राजेश कुमार यांनी शनिवारी (दि. ८) भेट देऊन आढावा घेतला. या वेळी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, संचालक डॉ. सुभाष घुले, विश्वास जाधव उपस्थित होते. राजेश कुमार म्हणाले, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत. दूरच्या प्रशिक्षणार्थींना लाभ मिळण्यासाठी संस्थेने समाज माध्यमांचा वापर वाढवावा. मॅग्नेट प्रकल्पातून संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामकाजासाठी काही घटक घेता येतील का, याचाही विचार करावा. राज्यात काही ठिकाणी संस्थेच्या शाखा सुरू करता येतील का, याचीही चाचपणी करावी. कोकरे यांनी संस्थेविषयी माहिती दिली. संस्थेत १३ विषयांवरील प्रशिक्षण देण्यात येत असून, आजपर्यंत संस्थेने ६१ हजार ३०० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्याचे ते म्हणाले.

Punyanagari Dt. 10/07/2023

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने नाविन्यपूर्ण प्रशिक्षण सुरू करावेत

## अपर मुख्य सचिव राजेश कुमार

**पुणे :** राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने संस्था स्वबळावर उभी करण्यासाठी उत्पन्नाची नवीन साधने शोधावीत आणि नाविन्यपूर्ण प्रशिक्षण सुरू करावेत, असे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी केले.

राजेश कुमार यांनी तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला शनिवारी भेट देऊन आढावा घेतला. यावेळी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, संचालक डॉ. सुभाष घुले, विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

राजेश कुमार म्हणाले, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत. दूरच्या प्रशिक्षणार्थीना लाभ मिळण्यासाठी संस्थेने समाज माध्यमाचा वापर वाढवावा. 'मॅग्नेट' प्रकल्पातून संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामकाजासाठी काही घटक घेता येतील का याचाही विचार करावा. राज्यात काही ठिकाणी संस्थेच्या शाखा सुरू करता येतील का याचीही चाचपणी करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

कोकरे यांनी संस्थेविषयी माहिती दिली. संस्थेत १३ विषयावरील प्रशिक्षण देण्यात येत असून आजपर्यंत संस्थेने ६१ हजार ३०० प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान ही संस्था पणन मंडळाने १९९८ मध्ये स्थापन केली असून बाहेरच्या राज्यातील प्रशिक्षणार्थीही मोठ्या प्रमाणात येथे प्रशिक्षणासाठी येत असतात, अशी माहिती श्री.कदम यांनी दिली.

डॉ. घुले यांनी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या कामकाजाची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. यावेळी राजेश कुमार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

Kesari Dt. 10/07/2023

# सहकार विभागांतर्गत गतिमान सेवा द्या

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्याच्या सहकार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विभागांच्या योजना, त्यांचे कार्य आणि सेवांची माहिती ऑनलाइन पद्धतीने देण्यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तत्काळ तयार करा, त्यातून ऑनलाइनद्वारे शेतकरी आणि नागरिकांना गतिमान सेवासुविधा देण्यावर भर देण्याच्या सूचना सहकार पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी येथे दिल्या.

**अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या सूचना**

सहकार विभागाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि. ७) साखर संकुल येथील सभागृहात सर्व विभागांची एकत्रित आढावा बैठक घेतली. साखर आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पुष्पगुच्छ देऊन राजेश कुमार यांचे स्वागत केले. या वेळी सहकार आयुक्त अनिल कवडे, राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक तावरे, पणन संचालक शैलेश कोतमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, महाराष्ट्र राज्य सहकार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राजेश कुमार म्हणाले की, शेतकरी आणि नागरिकांना गतिमान सेवासुविधा द्यायच्या असतील, तर संगणकीकरणाचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी व्यवसाय सुलभता आणून नागरिकांना ऑनलाइनद्वारे लाभ घेता यावा, यादृष्टीने सहकार विभागाच्या सर्व विभागांचे एकत्रित पोर्टल तातडीने विकसित करण्यात यावे. त्यामध्ये सहकार आयुक्तालय, साखर आयुक्तालय, पणन संचालनालय, राज्य वखार महामंडळ, राज्य सहकार विकास महामंडळ, राज्य कृषी पणन मंडळ, अशा सर्व कार्यालयांमार्फत चालणारे काम एकाच पोर्टलवर उपलब्ध होण्यासाठी तीन महिन्यांत पोर्टलचे काम पूर्ण करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

Pudhari Dt. 08/07/2023

# शेतकरी निर्यातदार व्हावा यासाठी प्रयत्न करणार : संजय कदम

## पणन मंडळाच्या कार्यकारी संचालक पदाचा पदभार स्वीकारला

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : शेतीतील तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी निर्यातक्षम शेतमालाचे उत्पादन घेत आहे. मात्र त्यातुलनेत निर्यात होत नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाची जास्तीत जास्त निर्यात व्हावी यासाठी पणन मंडळाच्या निर्यात सुविधाकेंद्रांची क्षमतावृद्धी आणि बळकटीकरण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे पणन मंडळाचे नवनियुक्त कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

नागपूर विभागीय सहनिबंधक पदावरून कदम यांची राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यकारी संचालकपदी बदली झाली आहे. त्यांनी शुक्रवारी (ता. ७) पदाचा पदभार सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्याकडून घेतला. यावेळी त्यांनी संवाद साधला.

कदम म्हणाले, ''राज्य कृषी पणन मंडळाद्वारे शेतकरी निर्यातदार व्हावा यासाठी निर्यातदार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याद्वारे अनेक तरुण शेतकरी निर्यातदार झाले आहेत. तरुण शेतकऱ्यांना शेतीकडे आकर्षित करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेती व निर्यात यावर पणन मंडळ यापुढे काम करणार आहे. पणन मंडळाद्वारे तळेगाव दाभाडे येथे नेदरलॅंड सरकारच्या सहकार्याने फ्लोरिकल्चर एक्सलन्स सेंटर उभारले आहे. या केंद्राद्वारे अत्याधुनिक फुलशेतीकडे तरुण शेतकरी वळत आहेत.''



**पुणे : राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यकारी संचालकपदाचा पदभार संजय कदम (उजवीकडे) यांनी विनायक कोकरे यांच्याकडून स्वीकारला.**

Agrowon Dt. 08/07/2023

पुढारी

# बाजार समित्यांवर नियुक्त्यांचा प्रस्ताव

## उत्पन्नानुसार ४ किंवा २ निमंत्रितांना संधी शक्य

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर तज्ज्ञ संचालक नेमण्याचा निर्णय तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने बदलून भाजपच्या निर्णयाला शह दिला होता. आता पुन्हा कृषी, कृषी प्रक्रिया, कृषी पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश बाजार समित्यांवर विशेष निमंत्रित म्हणून करण्याची मागणी काही लोकप्रतिनिधींकडून सुरू झाल्याने शासनानेच तसा प्रस्ताव पणन संचालनालयाकडून मागवून घेतल्याचे समजते.

**बाजार समिती वर्तुळात चर्चा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांना काही लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे बाजार समित्यांवर तज्ज्ञ संचालक म्हणून विशेष निमंत्रितांची वर्णी लावण्याची मागणी केल्याचे सांगण्यात येते.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कायद्यातील कलम १३ (१) (१क) (एक) नुसार ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात बसविलेल्या व गोळा केलेल्या फीपासून मिळणारे उत्पन्न हे पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर ४ विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील. तसेच ज्या बाजार समितीचे असे उत्पन्न पाच कोटी रुपयांपर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर २ विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील. विशेष निमंत्रितांना बाजार समितीच्या चर्चांमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल.

My Pune Edition
Jul 7, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# पुणेकरांनी चाखला १९ कोटींचा हापूस!

## पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाची सांगता

▸ **गणेश कोरे**

**पुणे, ता. ४ :** यंदा हवामान बदलांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या कोकणातील हापूस आंब्याचे उत्पादन मोठ्याप्रमाणावर घटले होते. परिणामी बाजारपेठेत ऐन सणासुदींच्या काळात हापूस आंब्याची टंचाई निर्माण झाली होती. मात्र या टंचाईतही महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुण्यातील आंबा महोत्सवातून ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. शेतकरी ते ग्राहक या उपक्रमाअंतर्गत झालेल्या महोत्सवातून पुणेकरांनी सुमारे १९ कोटी रुपयांचा आंबा चाखला आहे. तर आंबा निर्यातीमध्येही यंदा वाढ झाली.

यंदाच्या आंबा महोत्सव एक एप्रिल ते तीन जून २०२३ दरम्यान मार्केट यार्डमधील जिल्हा परिषदेच्या जागेवर झाला. यामध्ये ६७ स्टॉल्स होते. त्यात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादक शेतकऱ्यांसह कोल्हापूर सातारा जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक असे १०५ शेतकरी सहभागी झाले होते. टिकलेल्या मोहराच्या पहिल्या टप्प्यात बाजारात आंब्याची आवक नियमित सुरू झाली. मार्च महिन्यात ती अपेक्षेएवढी होती. फेब्रुवारीत दिवसा तापमान अधिक असायचे. रात्री तापमानात घट व्हायची. त्यामुळे दुसऱ्या बहरात झाडांना पालवी जास्त येऊन मोहोर कमी आला. अलीकडील दिवसांतही ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस व गारपीट हे प्रकार घडले.




### आवक अन् दर

**यंदाच्या आंबा महोत्सवावर हवामान बदलाचे सावट असल्याने एप्रिल महिन्यात महोत्सवाच्या प्रारंभाला आवक कमी राहिल्याने दर ७०० ते १ हजार २०० रुपये राहिल्याचे पणन मंडळाचे सहाय्यक सरव्यवस्थापक आणि महोत्सवाचे नियंत्रक मंगेश कदम यांनी सांगितले. एप्रिलचा पूर्ण महिना हे दर कायम होते. यानंतर मे महिन्यामध्ये आवक सुरळीत होऊन, दर ५०० ते ७०० रुपये प्रति डझन राहिले. यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातून आवकेला सुरुवात झाल्यानंतर आंबा थोडा आवाक्यात आला. यावेळी दर ३०० ते ५०० रुपये डझन राहिला. महोत्सवामध्ये साधारण अडीच ते तीन लाख डझन आंबा विक्री झाली. यावेळी महोत्सवामध्ये सरासरी ७०० रुपये प्रति डझन विक्रीतून साधारण १९ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे कदम यांनी सांगितले.**

> या वर्षी तापमानातील चढ-उतार, धुके, अवकाळी पाऊस आदी विविध कारणांनी उत्पादनात सुमारे ५० टक्क्यांपर्यंत उत्पादनात घट झाली आहे. फेब्रुवारीमधील आगापचा हंगाम चांगला मिळाला. दुसऱ्या आणि तिसऱ्या हंगामात मोहरच न आल्याने ५० टक्केच उत्पादन मिळाले.
>
> **- दर्शन नार्वेकर,** वाडा, ता. देवगड, सिंधुदुर्ग

> यंदाच्या आंबा हंगामात टंचाईमध्ये देखील आंबा निर्यात चांगली झाली. एप्रिलमध्ये निर्यातीसाठी आंब्याची टंचाई होती. मात्र मेमध्ये चांगला आंबा उपलब्ध झाला. यावर्षी आम्ही अमेरिका, ऑस्ट्रेलिया, लंडन, जपान आणि नेदरलँड येथे ६५० टन आंबा निर्यात केली. गेल्यावर्षीच्या तुलनेत १०० टनांनी जास्त आंबा आम्ही निर्यात केला. यामध्ये अमेरिकेचा वाटा जास्त होता.
>
> **- अभिजित भसाळे,** रेनबो इंटरनॅशनल एक्स्पोर्टस्

# शेतकऱ्यांना लाभला आंबा महोत्सवाचा आधार

गणेश कोरे

**यंदा हवामान बदलांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या कोकणातील हापूस आंब्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले. बाजारपेठेत ऐन सणासुदींत टंचाई निर्माण झाली. मात्र महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या शेतकरी ते ग्राहक अशा थेट विक्रीच्या पुणे येथील आंबा महोत्सवाचा शेतकऱ्यांना मोठा आधार झाला. ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत सुमारे १९ कोटी रुपयांची उलाढाल झाली.**






← आंबा महोत्सवाला यंदा ग्राहकांचा चांगला प्रपतिसाद लाभला. ↑

मॉन्सूनचा पाऊस व खरीप हंगाम सक्रिय झाला आहे. शेतकरी पेरणी, पीक नियोजनात व्यस्त आहे.बाजारपेठेत केशर, बदाम वा अन्य प्रकारचे आंबे दिसत असले तरी आंब्याचा हंगाम आता जवळपास संपला आहे. त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी सांगता झालेल्या आंबा बाजारपेठेचा वेध इथे घेतला आहे. आंबा बाजारपेठेतील दरवर्षी महत्त्वाचा भाग असतो तो राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने होणाऱ्या आंबा महोत्सवाचा. यंदाचा महोत्सव एक एप्रिल ते तीन जून दरम्यान 'मार्केट यार्ड' मधील जिल्हा परिषदेच्या जागेवर यशस्वी पार पडला. यात ६७ स्टॉल्स होते. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांसह कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक असे १०५ शेतकरी सहभागी झाले.

## हंगामातील विक्री, उलाढाल

यंदाच्या आंबा महोत्सवावर हवामान बदलाचे सावट राहिले. एप्रिलमध्ये महोत्सवाच्या प्रारंभाला आवक कमी राहिली. दर ७०० ते एकहजार २०० रुपये प्रति डझन राहिल्याचे पणन मंडळाचे सहाय्यक सरव्यवस्थापक आणि महोत्सव नियंत्रक मंगेश कदम यांनी सांगितले. एप्रिलचा पूर्ण महिना हे दर कायम राहिले. मेमध्ये आवक सुरळीत होऊन दर ५०० ते ७०० रुपये राहिले. त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातून आवकेला सुरवात झाल्यानंतर आंबा ग्राहकांच्या थोडा आवाक्यात आला. यावेळी दर ३०० ते ५०० रुपयांच्या मर्यादित होते. महोत्सवात अडीच ते तीन लाख डझन आंबा विक्री व सुमारे १९ कोटी रुपयांची उलाढाल झाली.

## हवामानाचे सावट

ऑक्टोबरमध्ये अवकाळी पाऊस तर नोव्हेंबर- डिसेंबरमध्ये थंडीचा कालावधी कमी राहिल्याचे पाहायला मिळाले. मोहोर लागण्याच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने पहिल्या टप्प्यातील मोहोर काही प्रमाणात गळाला. टिकलेल्या मोहोराच्या पहिल्या टप्प्यात आंब्याची आवक नियमित सुरू झाली. मार्च महिन्यात ती अपेक्षेएवढी होती. फेब्रुवारीत दिवसा तापमान अधिक असायचे. रात्री तापमानात घट व्हायची. त्यामुळे दुसऱ्या बहरात झाडांना पालवी जास्त येऊन मोहोर कमी आला. पुढील काही दिवसांत ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस व गारपीट हे प्रकार घडले.

## पणन मंडळाचा महोत्सव ब्रॅण्ड

बाजारपेठेत अनेकवेळा हापूस आंब्याच्या नावाखाली ग्राहकांची मोठी फसवणूकही होत असते. ग्राहकांना अस्सल हापूस आंबा मिळावा, शिवाय शेतकऱ्यांना मध्यस्थांविना ग्राहक मिळावा या उद्देशाने अनेक वर्षांपासून पणन मंडळाद्वारे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. शेतकरी आणि ग्राहकांचे ऋणानुबंध त्यातून निर्माण झाले आहेत. यातून दरवर्षी महोत्सवाला प्रतिसाद वाढत असून उलाढालीतही वाढ होत आहे. या माध्यमातून पणन मंडळाचा आंबा महोत्सव हा ब्रॅण्ड विकसित झाल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी सांगितले.

## अक्षय्य तृतीयेला राहिलेले दर

- किरकोळ बाजार- ८०० ते १३०० रुपये (प्रति डझन)
- घाऊक बाजार दर- चार ते सहा डझन पेटी- अडीच हजार ते चार हजार रु.
- पाच ते दहा डझन पेटी- साडेतीन हजार ते सहा हजार रु.

**“ आमची २५ ते ३० वर्षांपासूनची आंब्याची सुमारे ५०० झाडे आहेत. यावर्षी तापमानातील चढ-उतार, धुके, अवकाळी पाऊस आदी विविध संकटे आली. फेब्रुवारीमधील आगापचा हंगाम चांगला मिळाला. दुसऱ्या आणि तिसऱ्या हंगामात मोहोर न आल्याने ५० टक्केच उत्पादन हाती लागले. आंबा महोत्सवाचा चांगला आधार झाला. सहाशे पेट्यांची विक्री केली. त्यास ७०० ते एक हजार रुपये प्रति डझन दर मिळाला. टंचाईच्या काळातही ग्राहकांचा प्रतिसाद चांगला लाभला.**

**दर्शन नार्वेकर**, वाडा, ता. देवगड, सिंधुदुर्ग

९६५३६२२५३४

**आमची ४० वर्षांपूर्वीची सुमारे ६०० झाडे आहेत. अवकाळी पाऊस, गारपीट, थंडी कमी पडणे आदी कारणांमुळे ३० ते ४० टक्केच माल हाती लागला. महोत्सवात अक्षय तृतीयेसाठी किमान २०० पेट्या उपलब्ध असायच्या. यंदा माझ्याकडे केवळ ५० पेट्या होत्या. मात्र संपूर्ण महोत्सवात ३०० पेट्यांची विक्री करणे शक्य झाले. त्यास ६०० ते १२०० रुपये प्रति डझन दर मिळून चांगला आधार झाला.**

गणेश प्रभाकर देसाई

माजरे, संगमेश्वर, जि. रत्नागिरी

९५५२८५३४२१





भारतातून यंदा निर्यात झालेल्या आंब्याचे आकर्षक पॅकिंग.

## आंबा निर्यातीतही आघाडी

अलीकडील वर्षांत भारतीय आंब्याने निर्यातीतही चांगला वेग पकडला आहे. राज्य पणन मंडळांतर्गत वाशी (नवी मुंबई) येथे निर्यात सुविधा केंद्रामध्ये आंब्यावर विकिरण आणि उष्णजल प्रक्रिया केली जाते. यावर्षी त्याद्वारे ९४२ टन आंबा परदेशात निर्यात झाला. यात विकिरण केलेल्या आंब्यामध्ये अमेरिका येथे ८०६ टन, ऑस्ट्रेलियामध्ये २८ तर मलेशियामध्ये १ टन निर्यात करण्यात आली. यामध्ये हापूस २५०, केशर २८५, बैंगनपल्ली १६३, दशहरी, लंगडा हिमायत, राजापूरी आणि रसालू आदींचा १०८ टनांचा समावेश आहे. उष्णजल प्रक्रियेद्वारे जपान येथे ४०, न्यूझिलंड येथे ८४, दक्षिण कोरिया येथे ४ आणि युरोपियन महासंघातील देशांमध्ये ८ टन निर्यात झाली. यात केशर, हापूस, बैंगनपल्ली आणि बदामी आंब्याचा समावेश राहिला.

**“ 'यंदाच्या एप्रिलमध्ये निर्यातीसाठी आंब्याची टंचाई होती. मात्र मे मध्ये तो चांगल्या प्रमाणात उपलब्ध झाला. आम्ही अमेरिका, ऑस्ट्रेलिया, लंडन, जपान आणि नेदरलँड येथे ६५० टन आंबा निर्यात केला. गेल्यावर्षीच्या तुलनेत तो १०० टनांनी जास्त होता. यात अमेरिकेचा वाटा जास्त होता.**

अभिजित भसाळे,

रेनबो इंटरनॅशनल एक्सपोर्टस